# एमबीएमसी राज्यातील पहिली पेपरलेस महापालिका

## केंद्र शासनाकडून प्रशस्तीपत्र देऊन गौरव

■ भाईंदर, प्रतिनिधी

मीरा-भाईंदर महानगरपालिकेने सर्व विभागात ई-ऑफिस प्रणाली कार्यान्वित करून महापालिकेचा कारभार हा यशस्वीरित्या पेपरलेस केला असून स्वतंत्र ई- ऑफीस विभागाची स्थापनासुद्धा केली आहे. याबाबत केंद्र शासनाच्या राष्ट्रीय महितीशास्त्र केंद्र (एन आय सी) विभागाकडून प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले आहे. महापालिका आयुक्त तथा प्रशासक संजय काटकर यांच्या मार्गदर्शनानुसार महापालिका सर्व विभागाच्या कामातील पारदर्शकता वाढविण्याकरिता, प्रशासकीय कामकाज अधिक प्रभावी, गतिमान व पारदर्शक होण्या साठी ई-ऑफिस प्रणाली कार्यान्वित करून महापालिकेचा कारभार पेपरलेस करण्यात आला आहे. त्यासाठी उपायुक्त संजय शिंदे आणि सिस्टम मॅनेजर राज घरत यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र ई- ऑफीस विभागाची स्थापनासुद्धा करण्यात आली आहे. १५ ऑगस्ट रोजी ई-



ऑफिस प्रणालीची नोंदणी करून १५ दिवसांमध्ये संगणक व उद्यान विभागाचे कामकाज ई-ऑफिस पद्धतीने सुरू करण्यात आले होते. नंतर टप्प्या टप्प्याने इतर विभागांचे कामकाज ई-ऑफीस प्रणालीने सुरू करून १६ ऑक्टोबर पर्यंत सर्व विभागांचा कारभार पेपरलेस करण्यात आला. ई-ऑफीस प्रणाली बाबत वर्ग १ ते वर्ग ३ मधील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना (एन आय सी) यांच्या तांत्रिक कर्मचाऱ्यांमार्फत नियमित प्रशिक्षण देण्यात आले.नंतर यशदा पुणे या प्रशिक्षण संस्थेमार्फत ई-ऑफिस प्रशिक्षणामध्ये वर्ग १ ते ३ मधील २५० कर्मचाऱ्यांचे नामनिर्देशित करण्यात आले होते त्यापैकी १२५ कर्मचाऱ्यांचे ई-ऑफिसचे प्रशिक्षण पूर्ण झाले. ३२ कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार असून उर्वरित कर्मचाऱ्यांचे ५ बॅच मध्ये ई-ऑफिस प्रशिक्षण पूर्ण करण्यात येणार आहे. सर्व विभागांचा कारभार हा पेपरलेस करणारी मिरा भाईंदर महानगरपालिका ही राज्यातील पहिली महापालिका ठरल्यामुळे केंद्र शासनाच्या राष्ट्रीय महितीशास्त्र केंद्र (एन आय सी) विभागाकडून प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. महापालिका आयुक्त संजय काटकर यांनी अति. आयुक्त (माहिती तंत्रज्ञान) संभाजी पानपट्टे, उपायुक्त (माहिती तंत्रज्ञान) संजय शिंदे, सिस्टम मॅनेजर राज घरत व महापालिकेतील सर्व अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

# ई-ऑफिस प्रणाली को लेकर मीरा भायंदर मनपा को प्रशंसा प्रमाण पत्र से किया गया सम्मानित

**भायंदर:** मीरा भायंदर महानगरपालिका के आयुक्त एवं प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.पु.से.) के मार्गदर्शनानुसार मनपा के सभी विभागों के कार्यों में पारदर्शिता बढ़ाने हेतु ई-ऑफिस लागू कर मनपा प्रशासन को पेपरलेस बनाया गया है।मीरा भायंदर महानगरपालीका विभागों के प्रशासनिक कार्यों को और अधिक प्रभावी, गतिशील एवं पारदर्शी बनाने की व्यवस्था के उद्देश्य को लेकर एक अलग ई-ऑफिस विभाग भी स्थापित किया गया है। मनपा आयुक्त के आदेशानुसार उपायुक्त संजय शिंदे एवं सिस्टम मैनेजर राज घरत की अध्यक्षता में ई-ऑफिस प्रणाली लागू की गयी है. केंद्र सरकार के इलेक्ट्रॉनिक्स और सूचना प्रौद्योगिकी मंत्रालय के तहत राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र (एनआईसी) के माध्यम से सभी विभागों में ई-ऑफिस प्रणाली लागू करने के लिए मीरा भायंदर महानगरपालिका को प्रशंसा प्रमाण पत्र से सम्मानित किया गया है।



प्राप्त जानकारी के अनुसार 15 अगस्त 2023 को ई-ऑफिस प्रणाली में पंजीयन कराकर 15 दिन के अन्दर ही कम्प्यूटर एवं पार्क विभाग का कामकाज ई-ऑफिस मोड में प्रारम्भ कर दिया, इसके बाद चरणबद्ध तरीके से मनपा के अन्य विभागों का काम भी ई-ऑफिस प्रणाली से शुरू किया गया और 16 अक्टूबर 2023 तक सभी विभागों का प्रशासन पेपरलेस कर दिया गया है. ई-ऑफिस प्रणाली के संबंध में कक्षा 1 से कक्षा 3 तक के सभी अधिकारियों एवं कर्मचारियों को राष्ट्रीय सूचना विज्ञान केन्द्र के तकनीकी स्टाफ के माध्यम से नियमित प्रशिक्षण दिया गया। इसके बाद प्रशिक्षण संस्थान पुणे के माध्यम से कक्षा 1 से कक्षा 3 तक के 250 कर्मचारियों को ई-ऑफिस प्रशिक्षण के लिए नामांकित किया गया है। उनमें से 125 कर्मचारियों ने ई-ऑफिस प्रशिक्षण पूरा कर लिया है। 08 नवम्बर 2023 को 32 कर्मचारियों को प्रशिक्षण दिया जायेगा तथा शेष कर्मचारियों का ई-ऑफिस प्रशिक्षण 5 बैचों में पूर्ण किया जायेगा। मीरा भायंदर मनपा सभी विभागों के प्रशासन को पेपरलेस बनाने वाला राज्य का पहला महानगरपालिका बन गया है। ई-ऑफिस प्रणाली के सफल क्रियान्वयन के साथ आयुक्त एवं प्रशासक संजय श्रीपतराव काटकर आयुक्त (सूचना प्रौद्योगिकी) संभाजी पानपट्टे, उपायुक्त (सूचना प्रौद्योगिकी) संजय शिंदे, सिस्टम मैनेजर राज घरात को मनपा के सभी अधिकारियों को बधाई दी है.

सकाळ

केंद्र सरकारकडून दखल; प्रशस्तिपत्रकाने सन्मान

# 'पेपरलेस'मध्ये मिरा-भाईंदर पालिका अव्वल

भाईंदर, ता. ८ (बातमीदार) : ई-ऑफिस यंत्रणेद्वारे सर्व विभागांचा कारभार कागदविरहित (पेपरलेस) करणारी मिरा-भाईंदर ही राज्यातील एकमेव महापालिका ठरली आहे. केंद्र सरकारच्या नॅशनल एन्फॉर्मेटिक्स सेंटर (एनआयसी) या विभागाकडून महापालिकेला प्रशस्तिपत्रक देऊन गौरव करण्यात आला.

केंद्र सरकारच्या धोरणानुसार, सर्व महापालिकांनी ई-ऑफिसच्या माध्यमातून आपला कारभार कागदविरहित म्हणजेच पेपरलेस करण्याचे राज्य सरकारचे आदेश आहेत. मिरा-भाईंदर महापालिकेचे आयुक्त संजय काटकर यांनी पदाची सूत्रे हाती घेताच ई-ऑफीस लागू करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार १५ ऑगस्टला ई-ऑफिस प्रणालीची 'एनआयसी'कडे नोंदणी करण्यात आली.

पहिल्या १५ दिवसांत संगणक व उद्यान विभागाचे कामकाज ई-ऑफीस पद्धतीने सुरू झाले व टप्प्याटप्प्याने सर्व विभागात ही यंत्रणा लागू करून १६ ऑक्टोबरपर्यंत सर्व विभाग ई-ऑफीस यंत्रणेद्वारे काम करू लागले. त्यामुळे महापालिकेचा सर्व कामकाज 'पेपरलेस' झाले असल्याचा दावा प्रशासनाकडून करण्यात आला आहे. महापालिकेने उपायुक्त संजय शिंदे व सिस्टीम मॅनेजर राज घरत यांच्या नेत्तृत्वाखाली स्वतंत्र ई-ऑफिस विभाग स्थापन केला.



भाईंदर : महापालिका आयुक्तांचा कर्मचारी संघटनांकडून गौरव करण्यात आला.

## कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण

ई-ऑफिस यंत्रणा लागू करण्यासाठी १ ते ३ श्रेणी कर्मचाऱ्यांना 'एनआयसी'च्या तांत्रिक कर्मचाऱ्यांकडून प्रशिक्षण देण्यात आले. ई-ऑफीस यंत्रणेद्वारे सर्व विभागांचा कारभार पेपरलेस करणारी मिरा-भाईंदर ही राज्यातील एकमेव महापालिका ठरली आहे. त्याबद्दल 'एनआयसी'कडून महापालिकेला नुकतेच प्रशस्तिपत्रक देण्यात आले.

## व्यवहारामध्ये पारदर्शकता

ई-ऑफिस यंत्रणेत कामाचे सर्व प्रस्ताव, पत्रव्यवहार ऑनलाईन पद्धतीने सादर केले जातात. वरिष्ठ अधिकारीदेखील प्रस्तावांना ऑनलाईनच मान्यता देतात. याशिवाय प्रत्येक प्रस्ताव कर्मचारी व अधिकारी यांनी विशिष्ट मुदतीच मान्य अथवा नाकारायचा आहे. असे न केल्यास त्याचा खुलासा वरिष्ठांना द्यावा लागतो. ई-ऑफिस यंत्रणेमुळे कामकाजात अधिक गती आली असल्याचा दावा महापालिका प्रशासनाने केला आहे. व्यवहारामध्ये पारदर्शकता येण्यास मदत झाली.

Mumbai, Palghar-Today
09/11/2023 Page No. 1